अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २५ जुलै २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : २९६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## मानेगाव येथे शेतीच्या वादातून कोयता चाकू अन् रॉडने मारहाण; दोघे जखमी

सोलापूर/प्रतिनिधी

शेतीच्या वादातून शिंदे आणि राऊत यांच्या गटात कोयता, चाकू, रॉड आणि लाथा बुक्याने झालेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना मानेगाव (ता.माढा) येथील चौकात सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. सर्व जखमींना माढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उल्हास केरू राऊत (वय ५१ रा.मानेगाव) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. काल दुपारी १ वाजेच्या सुमारास त्याला मानेगाव येथील चौकात नानासाहेब सत्यवान शिंदे, रोहन विजय शिंदे आणि इतर दोघांनी मिळून कोयता लोखंडी रॉड आणि केबलने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील अशोक सत्यवान शिंदे (वय २५ रा.मानेगाव) हा जखमी झाला. त्याला शेतीच्या वादातून उल्हास केरू राऊत, अलंकार उल्हास राऊत आणि इतर दोघांनी मिळून सत्तुर, चाकू, कोयता आणि लाथाबुक्याने मारहाण केली. अशी नोंद प्राथमिक तालुका पोलिसात झाली आहे.

# प्रेमप्रकरणातून तरुणाला धाडले यमसदनी

## माळशिरस तालुक्यात रात्री मारहाणीचा थरार

- बॅट अन् काठीच्या सहाय्याने तिघांकडून हल्ला
- एका संशयितास अटक; शुक्रवारपर्यंत पोलीस कोठडी
- निमगाव पाटी, विझोरी गावची घटना
- मारेकरी आणि मृत जवळचे नातेवाईक

अकलूज/प्रतिनिधी

**तुम्ही मुलीस फोन का करता? असा जाब विचारत रामराज अशोक वाघमोडे याच्यासह रामचंद्र व्यंकू वाघमोडे, सिद्धनाथ रामचंद्र वाघमोडे व बापूराव व्यंकू वाघमोडे (सर्व रा. निमगांव पाटी, विझोरी ता. माळशिरस) या सर्वांनी मिळून लाकडी बॅट, काठी अन् लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत वाघमोडे यांच्या नात्यामधील अंबादास रामा जाधव (रा. मोरोची, ता. माळशिरस) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. तर मृत तरुण अंबादास याचा जोडीदार शंकर पवार जखमी झाला आहे. पुणे-पंढरपूर रस्त्यावरील निमगाव पाटी, विझोरी (ता. माळशिरस) येथे सोमवारी (ता.२२) रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली.**

मृत तरुण अंबादास जाधव

(संग्रहित छायाचित्र)

दरम्यान या प्रकरणी जखमी शंकर पवार यांनी अकलूज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी संशयित आरोपी रामराज अशोक वाघमोडे यास अटक करण्यात आली असून त्याला शुक्रवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश माळशिरस न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबरच अजून पवार आणि संबंधित मुलगी यांनादेखील मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

मिळालेली अधिक माहिती अशी की, शंकर यल्लाप्पा पवार, अर्जुन भाऊसाहेब पवार व अंबादास रामा जाधव तिघेही (रा. मोरोची ता. माळशिरस) असे तिघेजण मोटारसायकल वरून वेळापूर येथील नातेवाईकांकडील कार्यक्रम उरकून मोरोची (ता. माळशिरस) येथे परत जात असताना रात्री ९.४५ वाजण्याच्या दरम्यान वेळापूर-माळशिरस रस्त्यावरील निमगांवपाटी, विझोरी येथील एका दगडाच्या ढिगाऱ्याजवळ लघूशंका करण्यासाठी थांबले होते.

या वेळी संशयित आरोपी रामराज अशोक वाघमोडे तसेच रामचंद्र व्यंकू वाघमोडे, सिद्धनाथ रामचंद्र वाघमोडे व बापूराव व्यंकू वाघमोडे सर्व (रा. निमगांव पाटी, विझोरी ता. माळशिरस ) हे सर्व तिथे आले. या सर्वांनी मिळून शंकर पवार तसेच अंबादास रामा जाधव यांना मुलीला का फोन करता? असा जाब विचारला. पुढे तुम्हा एका-एकाला खल्लास करतो, असे म्हणून लाकडी बॅट, लाकडी काठीने व लाथाबुक्क्यांनी अंबादास रामा जाधव यास मारहाण केली. त्याचबरोबर अर्जुन पवार मुलीसदेखील मारहाण करून जखमी केली असे फिर्यादीत नमुद आहे.

मारहाणीच्या घटनेनंतर जखमी शंकर पवार तसेच अंबादास जाधव यांना उपचारासाठी अकलूज उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी पाठविले. येथील वैद्यकीय अधिकारी यांनी जखमी अंबादास जाधव हा मृत झाला असल्याचे उपचारापूर्वीच सांगितले. मारहाणीच्या घटनेसंदर्भात अकलूज पोलिसांना माहिती मिळताच अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे, रात्रगस्तीचे पोलीस उपनिरीक्षक बबन साळुंके, सहायक पोलीस निरीक्षक श्री चौधरी, पोलीस अंमलदार श्री गोरे, श्री निकम, श्री तांबोळी, स्वरुप शिंदे, नागरगोजे, महिला चालक हावळे यांचे पथक घटनास्थळी रवाना झाले होते.

या गुन्ह्याचा तपास अकलूज पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी हे करीत आहेत.

### मारहाणीचा घटनेला प्रेमप्रकरणाचे कारण

मृत अंबादास जाधव आणि तरुणी यांचे प्रेमप्रकरण होते. हे दोघे एकमेकांना फोनवरुन बोलत होते. त्यांचे हे प्रेमप्रकरण संशयित आरोपी रामराज वाघमोडे यास मान्य नव्हते. या प्रेमप्रकरणातून वाघमोडे हा अंबादास याच्यावर चिडून होता. त्यातून पुढे ही मारहाणीची घटना घडल्याचे समोर आल्याचे पोलीस सुत्रांनी सांगितले.

### मृत जाधवसह तिघे मुलीला गेले होते भेटायला

फिर्यादी शंकर पवार तसेच त्यांचे मित्र अर्जून पवार आणि चुलत भाचा मृत अंबादास जाधव हे तिघे निमगाव पाटी, विझोरी (ता. माळशिरस) येथे मुलीला भेटायला गेले होते. या घटनेमधील वाघमोडे आणि जाधव हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक आहेत, अशी माहितीदेखील पोलीस सुत्रांनी दिली.

## बार्शीत खंडणीसाठी बार मॅनेजरच्या खुनाचा प्रयत्न

बार्शी/प्रतिनिधी

फुकट जेवण करून बिल न देता २० हजाराची खंडणी मागून हॉटेलची तोडफोड करीत मॅनेजरला काचेच्या बाटलीने मारून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना बार्शी येथील एस.के. पॅलेस परमिट रूम येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात बार्शी शहरच्या पोलिसांनी चौघांवरुध्द खुनाचा प्रयत्न आणि खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे.

महेश अंधारे असे एस.के. पॅलेस परमिट रूमच्या जखमी झालेल्या व्यवस्थापकाचे त्यांना नाव आहे. त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या संदर्भात हॉटेलचे चालक विकी शंकर कदम (रा.बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तथागत मस्के, निखिल ननवरे, सागर ओहोळ आणि समर्थ वस्ताद (सर्व रा. भीम नगर बार्शी) अशा चौघावर गुन्हा दाखल केला असून सर्वजण फरार आहेत.

### घटनेप्रकरणी चौघांवर पोलिसांत गुन्हा

विकी कदम यांचे कुर्डूवाडी रोडवरील कणसे कुशन दुकानाच्या शेजारी एसके पॅलेस नावाचे परमिट रूम आहे. काल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास तथागत मस्के यांच्यासह चौघांनी हॉटेलात आले होते . त्यानंतर त्यांनी बिल देण्याच्या कारणावरून हॉटेलच्या काउंटरवर बसलेल्या विकी कदम यांच्याशी वाद घातला. आणि आम्ही बिल देत नाही तुला कोणाला सांगायचे ते सांग ? आणि हॉटेल चालू ठेवायचा असेल तर दरमहा आम्हाला २० हजार रुपये दे असे म्हणत त्यांना काचेच्या बाटलीने बेदम मारहाण केली. आणि हॉटेलची तोडफोड केली. त्यात महेश अंधारे हे गंभीर जखमी झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

## सापटणे येथे घरफोडी; दीड लाखांचे दागिने गायब

सोलापूर/प्रतिनिधी

आतून बंद असलेल्या दरवाजाच्या कोंडी उचकटून चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही घरफोडी सापटणे (ता.माढा) येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात शिवाजी अभिमान्य ढवळे (रा. सापटणे) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री जेवण करून घरात झोपले होते. पहाटेच्या चारच्या सुमारास त्यांना कशाचा तरीआवाज आल्याने ते बाहेर जाऊन पाहणी केली. तेंव्हा एक चोरटा त्यांच्या मुलांच्या बेडरूम मधून पळून गेल्याचे दिसून आले. त्यांनी मुलाच्या खोलीत जाऊन पाहणी केली असता कपाटातील १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे दागिने गायब झाल्याचे दिसून आले . त्यानंतर ढवळे यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली . फौजदार सोनटक्के पुढील तपास करीत आहेत .

## बेशुद्ध अवस्थेतील महिलेचा मृत्यू

सोलापूर : स्वागत नगर परिसरातील ताई चौक येथे राहणारी भाग्यश्री संतोष रेड्डी (वय ३०) ही महिला अचानक बेशुध्द होऊन मृत झाली. मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारात घरातील फरशीवर ती बेशुध्द अवस्थेत आढळली.

याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी ॲम्बुलन्सद्वारे तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती मृत झाली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला यासाठी मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली.

## सांगवीत पाणी भरण्यावरुन तलवार, रॉडने मारहाण

सोलापूर : पाणी भरण्याच्या कारणावरून दोन गटात लोखंडी रॉड, काठी आणि तलवारीने झालेल्या मारहाणीत दोन महिलांसह पाचजण जखमी झाले. ही घटना सांगवी (ता. अक्कलकोट) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. सर्व जखमींना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काजल अनिल पवार (वय २६), विनोद चंदर जाधव (वय २९) आणि अनिल गोरखनाथ जाधव (वय ३० सर्व रा. सांगवी) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. काल सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घराजवळ पाणी भरण्याचा कारणावरून त्यांना बबन पवार वगैरे चौघांनी मिळून लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण केली.

दुसऱ्या गटातील राहुल गुजर पवार (वय २१) आणि चंपाबाई बबन पवार (वय ५० रा.सांगवी) हे दोघे जखमी झाले. त्यांना त्याच कारणावरून सायंकाळच्या सुमारास घरात घुसून दिलीप जाधव वगैरे १० ते १२ जणांनी मिळून तलवार आणि लाथाबुक्याने मारहाण केली.

# मराठा, धनगर अन् महिला आरक्षणावर प्रणिती शिंदेंनी संसदेत उठवला आवाज

- भाजप सरकार आरक्षण संपवित असल्याचा केला थेट आरोप
- महाराष्ट्रात तणाव वाढत असल्याचे आणून दिले निर्दशनास

नवी दिल्ली

**दिल्ली येथे सुरु असलेल्या संसदीय अधिवेशनामध्ये सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी बुधवारी (ता. २४) मराठा, धनगर आणि महिला आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करुन याप्रकरणी निर्णय होण्याची मागणी केली. या दरम्यान आरक्षणाच्या मुद्यावरुन महाराष्ट्रात तणाव वाढत असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दिले. भाजप सरकार आरक्षण संपविण्याचा घाट घालत असल्याचा गंभीर आरोपही देखील त्यांनी यावेळी संसदेत केला.**

खासदार शिंदे यांनी संसदेच्या अधिवेशनादरम्यान शुन्य प्रहारावेळी संसदेत महाराष्ट्रात सध्या जिव्हाळ्याचा विषय असलेला आणि ज्यातून जातीय तेढ निर्माण होत असल्याचा मराठा आणि धनगर आरक्षणचा प्रश्न मांडला.

यावेळी शिंदे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशासाठी संविधान दिले आहे. या संविधानानुसार भारत देशामध्ये मागासवर्गीयांना आरक्षण मिळाले. परंतु, काही वर्षापासून आपण बघत आहोत जे सरकार आहे बहुसंख्य कंपन्यामध्ये खासगीकरण करून आरक्षण संपविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा थेट आरोप शिंदे यांनी केला.

लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे यांच्या विजयामध्ये मराठा समाजाचाही मोलाचा वाटा आहे.

निवडणूक काळात मराठा समाजाने प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देत आरक्षणाच्या मुद्यावर संसदेत आवाज उठवण्याची मागणी केली होती. असेच प्रणिती शिंदे यांनी देखील आपल्या प्रचारादरम्यान मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी माझा पूर्ण पाठिंबा असल्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाच्या अनुषंगाने, आज प्रणिती शिंदे यांनी संसदेच्या अधिवेशनामध्ये मराठा आणि धनगर आरक्षणाच्या मुद्याला हात घातला.

खासदार शिंदे म्हणाल्या, महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाकरीता व धनगर आरक्षणाकरीता लोक रस्त्यावर उतरलेले आहेत. तेथे श्री जरांगे उपोषणाकरीता बसलेले आहेत. तसेच धनगर बांधवांची एसटी प्रवर्गात समावेश होण्याची मागणी करीत आहेत. यामुळे महाराष्ट्रामध्ये तणाव वाढत आहे. मात्र सरकारकडून बोटचेपी पणाची भूमिका घेतली जात आहे.

सध्या केंद्रामध्ये व राज्यामध्ये दोन्ही ठिकाणी भाजपचे सरकार आहे. मात्र सरकार आरक्षण प्रश्नावर तोडगा का काढत नाही? याकरीता कशामुळे वेळ लावत आहे? असा सवाल त्यांनी केंद्र सरकारला विचारला.

मराठा आरक्षणावरून महाराष्ट्रामध्ये मराठा आणि ओबीसी समाजात तणाव वाढत आहे. यामुळे आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने लवकरात लवकर बैठक घेऊन हा विषय तत्काळ मार्गी लावावा, असे आवाहन त्यांनी यावेळी सभागृहात सरकारला केले.

दिल्ली : संसदेत मराठा आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करताना प्रणिती शिंदे.

### जातीनिहाय जनगणा करण्यासह महिलांच्या आरक्षणाचीही मागणी

आरक्षणाच्या मुद्यावर बोलताना प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या की, देशाचे निडर विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी यापूर्वीच सांगितले आहे. देशात जातीनिहाय जनगणना करण्यात यावी. महिला आरक्षणाकरीता घोषणा झाली. परंतु, जनगणना झालेली नाही. जो पर्यंत जातीनिहाय जनगणना होत नाही तोपर्यंत महिलांना व पुरुषांना आरक्षण मिळणार नाही. त्यामुळे सरकारने जातीनिहाय जनगणना करून मराठा व धनगर समाजाचा आणि महिलांच्या आरक्षणाचा प्रश्न सुटेल असे आवाहन प्रणिती शिंदे यांनी केले आहे.

## जरांगे-पाटलांचे उपोषण स्थगित; १३ ऑगस्टपर्यंत सरकारला अल्टिमेटम

आंतरवली सराटी/प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी त्यांचं उपोषण १३ ऑगस्टपर्यंत स्थगित केलं आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न १३ ऑगस्टपर्यंत सोडवावा, नोंदी असलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावं अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मंगळवारी (२३ जुलै) रात्री त्यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना जबरदस्तीने सलाईन लावली. मनोज जरांगे म्हणाले, सलाईन लावून बेगडी उपोषण मी करणार नाही. त्याऐवजी मी उपोषण स्थगित करतो. राज्य सरकारने १३ ऑगस्टपर्यंत आम्हाला आरक्षण द्यावं. खरंतर माझी इच्छा होती की मला सलाईन लावू नये. मात्र माझ्या सहकाऱ्यांनी माझं ऐकलं नाही. त्यामुळे मी स्वतःहून उपोषण स्थगित करून सरकारला वेळ देण्याचा निर्णय घेतला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, सलाईन लावून बेगडी उपोषण करण्याला काही अर्थ नाही, सलाईन लावून, एका जागेवर पडून राहून मी उपोषण करणार नाही. मी असं केलं तर तो बेगडीपणा म्हटला जाईल. अशा प्रकारचं उपोषण मी करणार नाही. त्यापेक्षा मी असं उपोषण न केलेलं बरं. मी सलाईन लावून उपोषणाला बसल्याने सरकारलाही काही फरक पडणार नाही. उलट ते या उपोषणाला गांभीर्याने घेणार नाहीत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

तिकडून 'दोन नंबरची' परवाच घेतली!

| कल्याण |
|---|
| 689-34-266 |

| मुंबई |
|---|
| 130-40-370 |